महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर ,कोल्हापूर -४१६ ००४.
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board, Rajendranagar,Kolhapur - 416 004.

Phone s: Chairman 2690829[O] 2656044[R] Secrtary 2691405[O]2324079[R].
PBX – 2696101,2696102,2696103 FAX :[0231] 2690758 E-Mail :divsec.kop@ gmail.com

क्र.कोविमं/ माध्य.परीक्षा / 100
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- ०९/०४/२०२१.

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

विषय:-एप्रिल -मे २०२१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) आरोग्य व शारीरीक शिक्षण या विषयाची प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या कार्यपध्दतीबाबत.. ..

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या अधिनस्त सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, एप्रिल -मे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी आरोग्य व शारीरीक शिक्षण या विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कार्यपध्दती तयार करण्यात आली असून ती या पत्रासोबत सादर करण्यात आलेली आहे.

सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखन कार्य इ.घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना राहील. त्यामुळे सदर परीक्षेचे आपल्या शालेय स्तरावर आयोजन करुन त्याचे मूल्यांकन करुन प्रचलित पध्दतीप्रमाणे श्रेणी तक्त्यात श्रेणी नमूद करुन श्रेणी तक्ते मंडळ कार्यालयाकडे जमा करावेत.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा एप्रिल- मे २०२१

विद्यार्थ्यांसाठी असलेले आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा दोन्ही सत्रांत न घेता एकाच म्हणजे द्विवतीय सत्रात घ्यावी. प्रात्यक्षिक व लेखन कार्य प्रत्येकी ५० गुणांची परीक्षा घेऊन मिळालेल्या १०० गुणांपैकी प्रचलित पद्धतीनुसार श्रेणी देण्यात यावी.

सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखन कार्य इ. घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना राहिल. त्यामुळे सदर परीक्षेचे शालेय स्तरावर आयोजन करुन त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे जमा करावे.

| नियमित मूल्यांकन पध्दत | | | | | एप्रिल-मे २०२१ साठी मूल्यांकन पध्दत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रथम सत्र**<br>प्रात्यक्षिक कार्य = ५० गुण<br>लेखन कार्य = ५० गुण<br><br>**द्विवतीय सत्र**<br>प्रात्यक्षिक कार्य = ५० गुण<br>व लेखन कार्य = ५० गुण<br>याप्रमाणे परीक्षा घेऊन | | | | | **एकाच सत्रात**<br>खालीप्रमाणे परीक्षा घेऊन मिळालेल्या प्राप्त गुणांनुसार श्रेणी देण्यात यावी. | | | |
| प्र. सत्र | द्वि. सत्र | एकूण गुण | सरासरी | श्रेणी | प्रात्यक्षिक कार्य | लेखन कार्य | एकूण गुण | श्रेणी |
| १०० | १०० | २०० | १०० | | ५० | ५० | १०० | |
| | | | | | ज्या विद्यार्थ्यांचे लेखन कार्य अपूर्ण राहिले आहे त्यांचेकडून उशिरात उशिरा १० जूनपर्यंत जमा करुन घ्यावे<br><br>प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अभ्यासक्रमानुसार १० घटकांपैकी कोणत्याही ०५ घटकांची निवड करावी.<br>दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा न घेता लेखन कार्य पूर्ण करुन घ्यावे व प्रचलित पद्धतीनुसार त्यांना श्रेणी (H) देण्यात यावी. | | | |

कोविड-१९ ची परिस्थिती पाहता सर्व शासन नियमांचे पालन करुन मुख्याध्यापक व संबंधित विषय शिक्षकांनी परीक्षेचे आयोजन करावे.

**मार्गदर्शक सूचना** - कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करुन शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात. कॅामन साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरुपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करावा. उदा. स्किपिंग रोप, योगा मॅट/सतरंजी इ.